# मराठी (प्रश्न-पत्र–I)

## ( साहित्य )

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 250 |
|---|---|

**प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना**

**उत्तरपत्रिका लिहण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.

# MARATHI (PAPER—I)

## ( LITERATURE )

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250 |
|---|---|

**QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS**

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) भाषेची लक्षणे कोणकोणती आहेत?

(*b*) प्रमाणभाषा आणि बोली यांच्यात कोणत्या प्रकारचे संबंध असतात?

(*c*) डांगी बोलीची प्रमुख वैशिष्ट्ये सांगा.

(*d*) उभयान्वयी अव्यये शब्दयोगी अव्ययांपेक्षा भिन्न कशी ते लिहा.

(*e*) लोककथांचे प्रकार किती? कोणते?

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) सोस्यूर यांच्या भाषाविषयक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करा. 20

(*b*) तेराव्या शतकातील मराठीचे वेगळेपण कोणकोणत्या भाषिक विशेषांमधुन प्रकटते? 15

(*c*) सर्वसामान्य मराठी नाटक आणि लोकनाट्य यांमधील भेद स्पष्ट करा. 15

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) व्यावहारिक भाषा आणि काव्यभाषा यांतील साम्यभेद विस्तारपूर्वक लिहा. 20

(*b*) वऱ्हाडी बोलीच्या शब्दसंग्रहाची स्वरूपवैशिष्ट्ये कोणती? 15

(*c*) स्तरभेदांनुसार भाषिक परिवर्तन कशा प्रकारे होते? विवेचन करा. 15

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) राजकीय परिस्थितीच्या मराठी भाषेवरील परिणामांची सतराव्या शतकाच्या संदर्भात चिकित्सा करा. 20

(*b*) विभक्ती अर्थावरून मानाव्यात की प्रत्ययावरून या वादाचे समालोचन करा. 15

(*c*) कर्तरी, कर्मणी व भावे या प्रयोगांचे उपप्रकार कोणते ते सांगून त्यांची उदाहरणे द्या. 15

## SECTION—B

**5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) महदंबेच्या काव्यरचनेचा परिचय करून द्या.

(*b*) संत एकनाथांच्या बहुविध काव्य निर्मितीची चर्चा करा.

(*c*) ''तैसी आर्या मयूरपंताची''—असे का म्हणतात?

(*d*) आस्वादक समीक्षेचे महत्त्व अधोरेखित करा.

(*e*) स्त्रीवादाचा मराठी कवितेवरील प्रभाव अधोरेखित करा.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) 'आधुनिक कविपंचक' असे कोणाला उद्देशून म्हटले गेले आहे? का? 20

(*b*) साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यातील परस्परसंबंध उलगडून दाखवा. 15

(*c*) मध्ययुगीन मराठी कवयित्रींची काव्यविषयक कामगिरी सोदाहरण विशद करा. 15

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) भालचंद्र नेमाडे हे नवकादंबरीचे प्रवर्तक होत, असे का म्हटले जाते? चर्चा करा. 20

(*b*) नाटककार खाडिलकर यांची नाट्यक्षेत्रातील कामगिरी साधार लिहा. 15

(*c*) श्रेष्ठ कवी म्हणून अरुण कोलटकर यांची योग्यता सप्रमाण सिद्ध करा. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) साहित्यसमीक्षेची निरनिराळी कार्ये कोणती? त्यांचे वाचकांस कशा प्रकारे साहाय्य होते? 20

(*b*) बखर साहित्य हे इतिहास की कल्पित? सप्रमाण चिकित्सा करा. 15

(*c*) दलित कथा ग्रामीण कथेहून वेगळी कशी ते साधार लिहा. 15

★ ★ ★